महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा, संयुक्त (मुख्य) परीक्षा २०२५
दि. १८ मे, २०२६ **2025** पेपर क्रमांक-२

**A25**

संच क्र. **A**

प्रश्नपुस्तिका क्रमांक/Booklet No.

# प्रश्नपुस्तिका-II
# सामान्य अध्ययन व बुद्धीमत्ता चाचणी

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

### ताकीद

**ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपुस्तिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपुस्तिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) अधिनियम-2024" मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

SEAL

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. स्वराकडे बोट दाखवत, अमित म्हणाला, 'हिचे वडिल माझ्या आईच्या बहिणीचा मुलगा आहे'. अमितचे स्वराशी नाते कोणते ?

(1) काका (2) पुतण्या (3) भाऊ (4) यापैकी नाही

Pointing towards Swara, Amit said, 'Her father is the son of my mother's sister'. What is Amit's relation to Swara ?

(1) Uncle (2) Nephew (3) Brother (4) None of these

---

2. तीन वर्षाच्या अंतराने जन्मलेल्या 5 मुलांच्या वयांची बेरीज 50 वर्षे आहे. तर सर्वात लहान मुलाचे वय किती ?

(1) 4 वर्षे (2) 8 वर्षे (3) 10 वर्षे (4) यापैकी नाही

Five children are born at intervals of 3 years. The sum of their ages is 50 years. What is the age of the youngest child ?

(1) 4 years (2) 8 years (3) 10 years (4) None of these

---

3. एका सांकेतिक लिपीत वतन = ☆□卐 , नगर = □○△ तर त्याच लिपीत गवत = ?

(1) □☆○ (2) ○△□ (3) ○☆□ (4) □卐○

In a coded script, वतन = ☆□卐, नगर = □○△ so in the same script for गवत = ?

(1) □☆○ (2) ○△□ (3) ○☆□ (4) □卐○

---

4. खालील संख्या मालिकेत प्रश्नचिन्हांच्या जागी कोणत्या संख्या येतील ?

5, 6, 7, 12, 9, 18, 11, 24, 13, 30, ?, ?

(1) 36, 15 (2) 15, 30 (3) 16, 38 (4) 15, 36

Which numbers will come in the following number series in place of question marks ?

5, 6, 7, 12, 9, 18, 11, 24, 13, 30, ?, ?

(1) 36, 15 (2) 15, 30 (3) 16, 38 (4) 15, 36

---

5. खालील संख्याश्रेणीमध्ये पुढील संख्या कोणती असेल ?

2, 9, 28, 65, 126, _____.

(1) 256 (2) 217 (3) 356 (4) 317

In the following number series, what will be the next number ?

2, 9, 28, 65, 126, _____.

(1) 256 (2) 217 (3) 356 (4) 317

---

**6.** पुढीलपैकी कोणती आकृती चौकोण, आयत व त्रिकोण यामधील संबंध योग्यरितीने दर्शविते ?

(1)  (2)  (3)  (4) 

Which of the following figure correctly represents the relation between quadrilateral, rectangle and triangle ?

(1)  (2)  (3)  (4) 

---

**7.** खालील वर्तुळालेख पुस्तक प्रकाशित करण्यासाठी होणारे विविध खर्चाचे विवरण दर्शवित आहे. या वर्तुळालेखाचा अभ्यास करा आणि खालील प्रश्नाचे उत्तर द्या.




बाईंडिंगसाठी झालेल्या खर्चाशी संबंधित वर्तुळपाकळीचा केंद्रिय कोन किती ?

(1) 72° (2) 90° (3) 48° (4) 70°

The following pie chart shows the details of various expenses incurred in publishing a book. Study this pie chart and answer the following question.




What is the central angle of the sector representing the expenditure on binding ?

(1) 72° (2) 90° (3) 48° (4) 70°

---

**8.** एका टेबलवर ठेवलेल्या प्रकाशचित्राकडे (फोटोग्राफकडे) बोट दाखवून नीता म्हणाली 'तिची आई माझ्या आईची एकुलती एक मुलगी आहे.' याचा अर्थ, ते प्रकाशचित्र _________ चे आहे.

(1) नीता (2) नीताची बहिण

(3) नीताची आई (4) नीताची मुलगी

Pointing at a photograph kept on a table, Neeta said 'Her mother is the only daughter of my mother'. It means, that the photograph belongs to _________.

(1) Neeta (2) Neeta's sister

(3) Neeta's mother (4) Neeta's daughter

---

**9.** खालील प्रश्नात प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते अक्षर येईल ?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| B | 1 | G | 100 | ? |
| 4 | A | 49 | J | 196 |

(1) M (2) N (3) O (4) K

In the following question, which letter will come in place of question mark (?) ?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| B | 1 | G | 100 | ? |
| 4 | A | 49 | J | 196 |

(1) M (2) N (3) O (4) K

---

**10.** एक काम 1 पुरुष, 3 महिला आणि 4 मुले 96 तासात पूर्ण करू शकतात. तेच काम 2 पुरुष आणि 8 मुले 80 तासात पूर्ण करू शकतात. तसेच 2 पुरुष आणि 3 महिला ते काम 120 तासात करू शकतात. तर 5 पुरुष आणि 12 मुले तेच काम किती तासात पूर्ण करतील ?

(1) $39\frac{1}{11}$ तास (2) $42\frac{7}{11}$ तास (3) $43\frac{7}{11}$ तास (4) 44 तास

A piece of work can be done by 1 man, 3 women and 4 children in 96 hours. The same work can be done by 2 man and 8 children in 80 hours and by 2 men and 3 women in 120 hours. Then in how many hours will 5 men and 12 children complete the same work ?

(1) $39\frac{1}{11}$ hours (2) $42\frac{7}{11}$ hours (3) $43\frac{7}{11}$ hours (4) 44 hours

---

**11.** जल संचय जन भागीदारी पुरस्कार, 2025 मध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या राज्यांचा योग्य क्रम लावा.

(a) राजस्थान (b) छत्तीसगढ (c) तेलंगणा

(1) (a), (c), (b) (2) (b), (c), (a) (3) (c), (b), (a) (4) (b), (a), (c)

Arrange in an appropriate order of Best Performing State in Jal Sanchay Jan Bhagidari Awards, 2025.

(a) Rajasthan (b) Chhattisgarh (c) Telangana

(1) (a), (c), (b) (2) (b), (c), (a) (3) (c), (b), (a) (4) (b), (a), (c)

---

**12.** खालीलपैकी **योग्य** कथन/ने ओळखा.

(a) भारतीय सेनेच्या मेजर स्वाति शांताकुमार यांना 'समान भागीदार, स्थिर शांतता' विषयीच्या कार्यासाठी लैंगिक श्रेणीमध्ये संयुक्त राष्ट्र महासचिव यांचा 2025 चा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

(b) संयुक्त राष्ट्र सचिवालयाने मेजर राधिका सेन यांना 'वर्ष 2025 च्या सैन्य लैंगिक अधिवक्ता' म्हणून पुरस्कार प्रदान केला आहे.

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) (a) व (b) दोन्हीही (4) वरीलपैकी एकही नाही

Select the **correct** statement/s from the following.

(a) Major Swathi Shanthakumar from the Indian Army was honoured with the UN Secretary General's Award, 2025 in the Gender category for her work on the 'Equal Partners, Lasting Peace.'

(b) Major Radhika Sen has received award of the 'Military Gender Advocate of the Year 2025' by the United Nations Secretariat.

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Both (a) and (b) (4) None of these

---

**13.** 'ओपन ए आय' या अमेरीकन कंपनीने कृत्रीम बुद्धीमत्तेशी संबंधित खालीलपैकी कोणते साधन नोव्हेंबर 2022 मध्ये बाजारात आणले ?

(1) अलेक्सा (2) कोरटाना (3) चॅट जीपीटी (4) गुगल असिस्टंट

'Open AI' an American company, launched which tool related to the artificial intelligence in November 2022 ?

(1) Alexa (2) Cortana (3) Chat-GPT (4) Google Assistant

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**14.** (लोकसभा निवडणूक, 2024) संदर्भात जोड्या लावा.

| | 'अ' (राजकीय पक्ष) | | 'ब' (जिंकलेल्या जागांची संख्या) |
|---|---|---|---|
| (a) | जनता दल (संयुक्त) | (i) | 29 |
| (b) | तेलगु देसम पक्ष | (ii) | 22 |
| (c) | द्रविड मुनेत्र कड़गम | (iii) | 16 |
| (d) | अखिल भारतीय तृणमुल कांग्रेस | (iv) | 12 |

(1) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(2) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(3) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iii)
(4) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i)

Match the pairs – regarding (Loksabha Election, 2024)

| | 'A' (Political Party) | | 'B' (No. of Won Seats) |
|---|---|---|---|
| (a) | Janata Dal (United) | (i) | 29 |
| (b) | Telugu Desam Party | (ii) | 22 |
| (c) | Dravida Munnetra Kazhagm | (iii) | 16 |
| (d) | All India Trinamool Congress | (iv) | 12 |

(1) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(2) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(3) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iii)
(4) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i)

---

**15.** खालीलपैकी कोणत्या संस्थेने 43वा इंडिया इंटरनॅशनल ट्रेड फेअर (आय आय टी एफ) - 2024 आयोजित केला होता ?

(1) इंडिया ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशन (आय टी पी ओ)
(2) वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन (डब्ल्यू टी ओ)
(3) दक्षिण आशियाई व्यापार संघटना (एस ए टी ओ)
(4) नॅशनल ट्रेडींग ऑर्गनायझेशन (एन टी ओ)

Which of the following organization organized the 43rd India International Trade Fair (IITF) - 2024 ?

(1) India Trade Promotion Organisation (ITPO)
(2) World Trade Organisation (WTO)
(3) South Asian Trade Organisation (SATO)
(4) National Trading Organisation (NTO)

---

**16.** KIRTI (खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन) चे उद्दिष्ट खेळाडूंची एक शाश्वत फळी निर्माण करणे हे आहे, जेणेकरून भारताला _________ पर्यंत जगातील अव्वल 10 क्रिडा राष्ट्रांमध्ये स्थान मिळवण्यास मदत होईल.

(1) 2036 (2) 2037 (3) 2047 (4) 2040

KIRTI (Khelo India Rising Talent Identification) aims to create a sustainable pipeline of athletes to help India became a top 10 sporting nation by _________.

(1) 2036 (2) 2037 (3) 2047 (4) 2040

---

**17.** 'जागतिक कविता दिन' दरवर्षी ________ रोजी साजरा केला जातो. त्याची सुरुवात ________ मध्ये ________ या संस्थेने केली होती.

(1) मार्च 21, 1999, युनेस्को

(2) ऑक्टोबर 23, 2015, संयुक्त राष्ट्रे

(3) डिसेंबर 20, 2019, बुकर प्राईझ

(4) मे 29, 1945, पुलित्झर प्राईझ

'World Poetry Day' is held each year on ________. It was founded in ________ by ________.

(1) March 21, 1999, UNESCO

(2) October 23, 2015, UN

(3) December 20, 2019, Booker Prize

(4) May 29, 1945, Pulitzer Prize

---

**18.** पारादिप पोर्ट अथॉरिटी (पीपीए) ला ________, ________ आणि ________ मध्ये उत्कृष्ट प्रदर्शनासाठी पत्तन, पोत परिवहन आणि जलमार्ग मंत्रालयाच्या द्वारे आयोजित स्वच्छता पंधरवडा पुरस्कार, 2025 मध्ये प्रथम पुरस्काराने सन्मानित केले गेले.

(1) स्वच्छता, पृथक्करण, संकलन

(2) स्वच्छता, जागरूकता, सहभागीत्व

(3) स्वच्छता, जागरूकता, शुद्धीकरण

(4) स्वच्छता, शाश्वतता, सामुदायिक सहभाग

Paradip Port Authority (PPA) has awarded the first prize at the Swachhata Pakhwada Awards 2025, instituted by the Ministry of Ports, shipping and waterways, in recognition of its outstanding performance in ________, ________ and ________.

(1) Cleanliness, Segregation, Collection

(2) Cleanliness, Awareness, Participation

(3) Cleanliness, Awareness, Purification

(4) Cleanliness, Sustainability, Community Participation

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**19.** जोड्या लावा – (साहित्य अकादमी पुरस्कार, 2025, युवा पुरस्कार, 2025)
(मराठी भाषेतील शिफारस केलेले ग्रंथ)

| | **'अ' (लेखक)** | | **'ब' (ग्रंथ)** |
|---|---|---|---|
| (a) | आदित्य दवणे | (i) | तथागत |
| (b) | सुमेध इंगळे | (ii) | खोल खोल दुष्काळ डोळे |
| (c) | प्रदिप कोकरे | (iii) | महामाया निलवंती |
| (d) | चिन्मय मोघे | (iv) | युद्धानंतर |

(1) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i) (2) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(i)
(3) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii) (4) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(i), (d)-(iv)

Match the pairs -
Sahitya Akademi Award, 2025 – Yuva Puraskar, 2025
(Recommendation in Marathi Language Books)

| | **'A' (Author)** | | **'B' (Book)** |
|---|---|---|---|
| (a) | Aditya Davane | (i) | Tathagat |
| (b) | Sumedh Ingle | (ii) | Khol Khol Dushkal Dole |
| (c) | Pradeep Kokare | (iii) | Mahamaya Nilavanti |
| (d) | Chinmay Moghe | (iv) | Yuddhanantar |

(1) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i) (2) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(i)
(3) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii) (4) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(i), (d)-(iv)

---

**20.** 'रतन एन. टाटा : द ऑथोराईज्ड बायोग्राफी' हा ग्रंथ कोणी लिहीला आहे ?

(1) अरविंद अडिगा (2) अरुंधती रॉय (3) अमिताव घोष (4) थॉमस मॅथ्यू

Who authored the book, 'Ratan N.Tata : The Authorized Biography' ?

(1) Aravind Adiga (2) Arundhati Roy (3) Amitav Ghosh (4) Thomas Mathew

---

**21.** जर रु. 2 व रु. 5 यांची नाणी 3 : 2 या प्रमाणात घेतल्यास 320 रुपयाच्या एकूण रकमेत 2 रुपयाची किती नाणी येतील ?

(1) 40 (2) 45 (3) 60 (4) 65

If coins of Rs. 2 and Rs. 5 are taken in the proportion 3 : 2, how many coins of Rs. 2 will be there in a sum of Rs. 320 ?

(1) 40 (2) 45 (3) 60 (4) 65

---

**22.** $5^5$ या संख्येस 4 ने भागल्यास बाकी किती रहाते ?

(1) 0 (2) 1 (3) 2 (4) 3

What is the remainder if we divide $5^5$ by 4 ?

(1) 0 (2) 1 (3) 2 (4) 3

---

**23.** जर एक वर्तुळ □ABCD या आयताच्या सर्व शिरोबिंदुमधुन जात असेल. आयताची लांबी 8 सेमी. व रुंदी 6 सेमी. असेल तर त्या वर्तुळाची त्रिज्या ________ सेमी. असेल.

(1) 4 (2) 5 (3) 3 (4) 2.5

□ABCD is a rectangle and A circle passes through all the vertices of the rectangle. If length of rectangle is 8 cm and breadth 6 cm, the radius of circle is ________ cm.

(1) 4 (2) 5 (3) 3 (4) 2.5

---

**24.** एक विशिष्ट काम पूर्ण करण्यास मोहनला 15 दिवस लागतात तर तेच काम करायला रोहनला 12 दिवस लागतात. समीरच्या मदतीने त्यांनी ते काम फक्त 4 दिवसांत पूर्ण केले. तर एकट्या समीरला ते काम पूर्ण करण्यास किती दिवस लागतील ?

(1) 10 (2) 11 (3) 13 (4) 16

Mohan can do a certain job in 15 days and Rohan can do the same job in 12 days. With the help of Sameer, they did the job in 4 days only. Then, Sameer alone can do the job in how many days ?

(1) 10 (2) 11 (3) 13 (4) 16

---

**25.** 1 ते 101 पर्यंत असणाऱ्या नैसर्गिक सम संख्यांची बेरीज किती ?

(1) 1275 (2) 2550 (3) 2500 (4) 1270

What is the addition of all even natural numbers from 1 to 101 ?

(1) 1275 (2) 2550 (3) 2500 (4) 1270

---

**26.** एका हॉलची लांबी 15 मीटर व रुंदी 12 मीटर आहे. जर हॉलच्या तळाचे (floor) व छतांच्या (ceiling) क्षेत्रफळाची एकत्रित बेरीज ही चार भिंतींच्या क्षेत्रफळांच्या बेरजेइतकी असेल तर हॉलचे घनफळ किती ?

(1) 720 मीटर$^3$ (2) 900 मीटर$^3$ (3) 1200 मीटर$^3$ (4) 1800 मीटर$^3$

A Hall is 15 meter long and 12 meter broad. If the sum of the areas of the floor and ceiling is equal to the sum of the areas of four walls, then the volume of the hall is ________.

(1) 720 meter$^3$ (2) 900 meter$^3$ (3) 1200 meter$^3$ (4) 1800 meter$^3$

---

**27.** सोडवा :

$$\sqrt{10+\sqrt{25+\sqrt{108+\sqrt{154+\sqrt{225}}}}}$$

(1) 4 (2) 5 (3) 15 (4) 13

What is the value of :

$$\sqrt{10+\sqrt{25+\sqrt{108+\sqrt{154+\sqrt{225}}}}}$$

(1) 4 (2) 5 (3) 15 (4) 13

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**28.** 'अ' ने एक वस्तू रु. 400 ने विकत घेतली व 'ब' ला 10% नफ्याने विकली. 'ब' ने ती वस्तू 'क' ला 20% तोट्याने विकली, व 'क' ने 'ड' ला ती वस्तू 25% नफ्याने विकली. तर 'ड' ने ती वस्तू किती किंमतीत खरेदी केली ?

(1) रु. 352 (2) रु. 420 (3) रु. 440 (4) रु. 460

If 'A' purchased an item for Rs. 400 and sold it to 'B' with a profit of 10%. Again 'B' sold the item to 'C' at a loss of 20% and 'C' sold it to 'D' with a profit of 25%. Then at what price, 'D' purchased the item ?

(1) Rs. 352 (2) Rs. 420 (3) Rs. 440 (4) Rs. 460

---

**29.** पृथ्वीवरून नामशेष होण्याच्या मार्गावर असणाऱ्या काही प्राण्यांच्या प्रजातींची सध्या अस्तित्वात असलेली अंदाजित किमान व कमाल संख्या यांची आकडेवारी रायटर्स या वृत्तसंस्थेने प्रकाशित केली आहे, जिचा स्तंभालेख पुढे दिला आहे.




प्रत्येक प्रजातीच्या या किमान व कमाल संख्या अंदाजित असल्यामुळे त्यांची त्या त्या प्रजातीसाठी सरासरी घेतली असता कोणत्या प्रजातीची संख्या सर्वात कमी भरेल ?

(1) लाल लांडगा (2) प्युर्तो भगव्या पोटाचा पोपट

(3) ऑर्नेट जमिनी साप (4) सर्वांची सरासरी सारखीच आहे

The news-agency Reuters has published data about the minimum and maximum estimated number of certain species which are on the verge of being extinct from the earth, which is depicted in following bar graph ?




Since these minimum and maximum numbers for each species are estimated figures, if their average is taken for respective species, which species will be having least number ?

(1) Red Wolf (2) Puerto Orange-bellied Parrot

(3) Ornate Ground Snake (4) All species have same average

**30.** एका विद्यार्थ्यास शास्त्र, गणित व इंग्रजी या तीन विषयांच्या परिक्षेत क्रमशः 5 : 10 : 4 या प्रमाणात मार्क्स पडले. जर त्या विद्यार्थ्यास एकूण 380 मार्क्स पडले असतील तर त्यास गणित विषयात किती मार्क्स पडले ?

(1) 200 (2) 100 (3) 80 (4) 60

A student scored total 380 marks in an examination having Science, Maths and English subjects. The proportion of marks in these three subjects respectively is 5 : 10 : 4. How many marks the student scored in Maths ?

(1) 200 (2) 100 (3) 80 (4) 60

---

**31.** एक बोट 36 km प्रवास करण्यासाठी प्रवाहाच्या दिशेने (downstream) 6 तास घेते आणि प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने (upstream) 9 तास घेते. बोटीची स्थिर प्रवाहातील गती किती आहे ?

(1) 5 किमी/तास (2) 6 किमी/तास (3) 7 किमी/तास (4) 8 किमी/तास

A boat takes 6 hours to travel 36 km downstream and 9 hours to travel the same distance upstream. What is the speed of the boat in still water ?

(1) 5 km/h (2) 6 km/h (3) 7 km/h (4) 8 km/h

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**32.** सोबतच्या वृत्तलेखात एका कंपनीच्या महाराष्ट्रातील 5 विविध ठिकाणी A, B, C, D, E काम करीत असलेल्या व्यक्तींचे विवरण दिले आहे. काम करीत असलेल्या एकूण व्यक्तींची संख्या 6500 आहे. तर A व E या ठिकाणी काम करीत असलेल्या व्यक्तींची संख्या C या ठिकाणी काम करीत असलेल्या व्यक्तींपेक्षा किती जास्त आहे ?




(1) 975 (2) 390 (3) 490 (4) 545

The following pie chart shows the distribution of employees of a company in 5 different locations A, B, C, D, E in Maharashtra. Total number of employees is 6500. How many employees are more from locations A and E together than from location C ?




(1) 975 (2) 390 (3) 490 (4) 545

**33.** माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 5 च्या अनुषंगाने खालील विधानांचे अवलोकन करा :

(a) नियुक्त अधिकारी यांनी अर्ज प्राप्त झाल्याची पावती देणे आवश्यक आहे.

(b) अर्जदाराला अद्विितीय अर्जक्रमांकाची माहिती देणे आवश्यक आहे.

(c) अर्ज पूर्ण आहे किंवा नाही याची पर्वा न करता अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासूनच निर्धारित कालमर्यादा मोजली जाते.

खालीलपैकी कोणती/ते विधान/ने **बरोबर** आहेत ?

(1) (a) फक्त (2) (b) आणि (c) फक्त (3) (a) आणि (b) फक्त (4) (c) फक्त

Consider the following statements in view of Section 5 of Right to Information Act, 2005 :

(a) The designated officer must acknowledge the receipt of application.

(b) The applicant must be informed of the unique application number.

(c) The stipulated time limit is counted from the date of filing the application irrespective of completeness.

Which of the above statement/s is/are **correct** ?

(1) (a) only (2) (b) and (c) only (3) (a) and (b) only (4) (c) only

---

**34.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 प्रमाणे मुख्य आयुक्त आणि आयुक्त यांचा पदावधी किती राहील ?

(a) चार वर्षाच्या कालावधी पर्यंत, अथवा (b) पाच वर्षाच्या कालावधी पर्यंत, अथवा

(c) वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, (d) पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही.

(1) (a) फक्त (2) (b) फक्त (3) (b) आणि (c) फक्त (4) (b), (c) आणि (d) फक्त

As per Maharashtra Right to Public Services Act, 2015 the Chief Commissioner and the Commissioners shall hold Office :

(a) For a term of Four years, or

(b) For a term of Five years, or

(c) Until they attain the age of Sixty Five years,

(d) Shall not be entitled for reappointment.

(1) (a) only (2) (b) only (3) (b) and (c) only (4) (b), (c) and (d) only

---

**35.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या कलम 29(1) अनुसार राज्य शासनाला कोणता विशिष्ट अधिकार दिला गेला आहे ?

(1) त्याचे अधिकाऱ्यांने सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण देण्याचे अधिकार

(2) अडचणी दूर करण्याचे अधिकार

(3) अध्यादेश निरसित करण्याचे अधिकार

(4) दूसऱ्या न्यायालयांचे अधिकारितेस रोध आणण्याचे अधिकार

As per Section 29(1) of the Maharashtra Right to Public Services Act, 2015, the State Government has been given which specific power ?

(1) Power to Protection of action of it's officers which are taken in good faith

(2) Power to remove difficulties

(3) Power to repeal ordinances

(4) Power to bar jurisdiction of any other court

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**36.** खालीलपैकी कोणते विधान कलम 164 च्या अंतर्गत येत **नाही** ?

(1) मुख्यमंत्र्यांची नियुक्ती राज्यपाल करतील.

(2) इतर मंत्र्यांची नियुक्ती राज्यपालांद्वारे मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानुसार केली जाईल.

(3) राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपती करतील.

(4) मंत्रीमंडळ राज्याच्या विधानसभेला सामूहिकरित्या जबाबदार असेल.

Which of the following statement **does not** come under Article 164 ?

(1) The Chief Minister shall be appointed by the Governor.

(2) The other Ministers shall be appointed by the Governor on the advice of the Chief Minister.

(3) The Governor shall be appointed by the President.

(4) The Cabinet shall be collectively responsible to the Legislative Assembly of the State.

---

**37.** जोड्या लावा :

| | **समिती** | | **अध्यक्ष** |
|---|---|---|---|
| (a) | संघराज्य संविधान समिती | (i) | सरदार वल्लभभाई पटेल |
| (b) | वित्त व स्टाफ समिती | (ii) | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| (c) | मूलभूत हक्क समिती | (iii) | पंडित जवाहरलाल नेहरू |
| (d) | सुकाणू समिती | (iv) | डॉ. के.एम. मुन्शी |

(1) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(i), (d)-(iv)

(2) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

(3) (a)-(iii), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iv)

(4) (a)-(iii), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iv)

Match the pair :

| | **Committee** | | **Presidents** |
|---|---|---|---|
| (a) | Union Constitution Committee | (i) | Sardar Vallabhbhai Patel |
| (b) | Finance and Staff Committee | (ii) | Dr. Rajendra Prasad |
| (c) | Fundamental Rights Committee | (iii) | Pandit Jawaharlal Nehru |
| (d) | Steering Committee | (iv) | Dr. K.M. Munshi |

(1) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(i), (d)-(iv)

(2) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

(3) (a)-(iii), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iv)

(4) (a)-(iii), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iv)

---

**38.** खालीलपैकी कोणत्या राज्य विधानसभांमध्ये अनुसूचित जमातीसाठी आरक्षित जागा **नाहीत** ?

(a) तामिळनाडू (b) पंजाब

(c) उत्तर प्रदेश (d) गोवा

(1) फक्त (b) आणि (d) (2) फक्त (a) आणि (c)

(3) फक्त (b), (c) आणि (d) (4) फक्त (b) आणि (c)

Which of the following State Legislative Assemblies **does not** have reserve seats for Scheduled Tribes ?

(a) Tamil Nadu (b) Punjab

(c) Uttar Pradesh (d) Goa

(1) Only (b) and (d) (2) Only (a) and (c)

(3) Only (b), (c) and (d) (4) Only (b) and (c)

---

**39.** जोड्या जुळवा :

| | **मुख्यमंत्री** | | **कार्यकाल** |
|---|---|---|---|
| (a) | शंकरराव चव्हाण | (i) | 1975-1977 |
| (b) | वसंतदादा पाटील | (ii) | 1977-1978 |
| (c) | मनोहर जोशी | (iii) | 1991-1993 |
| (d) | सुधाकरराव नाईक | (iv) | 1995-1999 |

(1) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(2) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iv), (d)-(iii)
(3) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

Match the pairs :

| | **Chief Minister** | | **Tenure** |
|---|---|---|---|
| (a) | Shankarrao Chavan | (i) | 1975-1977 |
| (b) | Vasantdada Patil | (ii) | 1977-1978 |
| (c) | Manohar Joshi | (iii) | 1991-1993 |
| (d) | Sudhakarrao Naik | (iv) | 1995-1999 |

(1) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(2) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iv), (d)-(iii)
(3) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

---

**40.** 73वा घटना दुरुस्ती कायदा, 1992 मधील खालीलपैकी कोणत्या अनिवार्य तरतूदी आहेत ?
(a) गावामध्ये किंवा गावांच्या समुहामध्ये ग्रामसभेचे आयोजन करणे.
(b) गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर पंचायतराज संस्था स्थापन करणे.
(c) ग्राम स्तरावर ग्रामसभेला अधिकार व कार्ये बहाल करणे.
(d) पंचायत राज संस्थाच्या निवडणूका लढविण्यासाठी किमान वय 21 वर्षे असणे.
(1) फक्त (a), (b), (c) (2) फक्त (b), (c), (d)
(3) फक्त (a), (b), (d) (4) वरीलपैकी सर्व

Which of the following compulsory provisions of the $73^{rd}$ Constitutional Amendment Act, 1992 ?
(a) Organisation of Gram Sabha in a village or group of villages.
(b) Establishment of Panchayats at the village, intermediate and district levels.
(c) Endowing the Gram Sabha with powers and functions at the village level.
(d) 21 years to be the minimum age for contesting elections of Panchayats.
(1) Only (a), (b), (c) (2) Only (b), (c), (d)
(3) Only (a), (b), (d) (4) All of the above

---

**41.** भारतीय संविधानातील कोणते कलम राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्क निलंबित करण्याचा अधिकार देते ?
(1) 352 (2) 356 (3) 359 (4) 360

Which article of the Indian Constitution provides for the suspension of fundamental rights during a national emergency ?
(1) 352 (2) 356 (3) 359 (4) 360

---

**42.** संविधानाच्या प्रारंभीचे नागरिकत्वाबाबत खालीलपैकी **योग्य** कथने ओळखा.
संविधानाच्या प्रारंभी, भारताच्या राज्यक्षेत्रात ज्या व्यक्तिचा अधिवास आहे आणि __________.
(a) जी भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मली होती.
(b) जिच्या मातापित्यांपैकी कोणीही एक भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मले होते.
(c) जी अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी किमान सात वर्षे इतका काळ भारताच्या राज्यक्षेत्रात सामान्यतः निवासी आहे.
अशी प्रत्येक व्यक्ती भारताची नागरिक असेल.
(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (b) आणि (c)
(3) फक्त (a) आणि (c) (4) वरीलपैकी सर्व

Select the **correct** statements from the following about the citizenship at the commencement of the Constitution.
At the commencement of the Constitution, every person who has his domicile in the territory of India and __________.
(a) who was born in the territory of India.
(b) either of whose parents was born in the territory of India.
(c) who has been ordinarily resident in the territory of India for not less than seven years immediately preceding such commencement.
Shall be a citizen of India.
(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)
(3) Only (a) and (c) (4) All of the above

---

43. योग्य जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | वसंतराव नाईक समिती | (i) | 1977 |
| (b) | अशोक मेहता समिती | (ii) | 26 जून 1960 |
| (c) | बोंगीरवार समिती | (iii) | 18 जून 1984 |
| (d) | पी.बी. पाटील समिती | (iv) | 2 एप्रिल 1970 |

(1) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(2) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(3) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iii), (d)-(iv)
(4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Vasantrao Naik Committee | (i) | 1977 |
| (b) | Ashok Mehta Committee | (ii) | 26 June 1960 |
| (c) | Bongirwar Committee | (iii) | 18 June 1984 |
| (d) | P.B. Patil Committee | (iv) | 2 April 1970 |

(1) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(2) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(3) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iii), (d)-(iv)
(4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

---

44. खालीलपैकी कोणती संविधान दुरुस्ती मूलभूत कर्तव्याशी संबंधित आहेत ?

(a) बेचाळीसावी संविधान दुरुस्ती
(b) चव्वेचाळीसावी संविधान दुरुस्ती
(c) चौऱ्याऐंशीवी संविधान दुरुस्ती
(d) शहाऐंशीवी संविधान दुरुस्ती

(1) फक्त (a), (b) (2) फक्त (c), (d) (3) फक्त (a), (d) (4) फक्त (b), (c)

Which of the following Constitutional Amendments are related to Fundamental Duties ?

(a) Forty second Constitutional Amendment
(b) Forty fourth Constitutional Amendment
(c) Eighty fourth Constitutional Amendment
(d) Eighty sixth Constitutional Amendment

(1) Only (a), (b) (2) Only (c), (d) (3) Only (a), (d) (4) Only (b), (c)

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

45. खालीलपैकी **योग्य** कथन/ने ओळखा :

(a) विधानसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पद धारण करणारा सदस्य विधानसभेच्या त्या वेळच्या सर्व सदस्यांच्या बहुमताने पारित झालेल्या विधानसभेच्या ठरावाद्वारे त्याच्या पदावरून दूर केला जाऊ शकेल.

(b) अनुच्छेद 179 खंड (c) च्या प्रयोजनार्थ असणारा कोणताही ठराव, तो मांडण्याचा उद्देश असल्याबद्दल निदान चौदा दिवसांची नोटीस देण्यात आल्याखेरीज मांडला जाणार नाही.

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) व (b) दोन्ही (4) वरीलपैकी एकही नाही

Select the **correct** statement/s from the following :

(a) A member holding office as Speaker or Deputy Speaker of Legislative assembly may be removed from his office by a resolution of the Legislative Assembly passed by a majority of all the then members of the Assembly.

(b) No resolution for the purpose of Art. 179 clause (c) shall be moved unless at least fourteen days' notice had given of the intention to move the resolution.

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (a) and (b) (4) None of the above

---

46. मोठ्या संख्येने आदिवासी लोकसंख्या असलेल्या __________ राज्यातील मंत्रिमंडळाला आदिवासी व्यवहारांसाठी एक मंत्री समाविष्ट करण्याचे अनिवार्य करण्यात आले आहेत.

(a) महाराष्ट्र (b) तामिळनाडू (c) ओरिसा (d) मध्य प्रदेश
(e) बिहार (f) पंजाब

(1) फक्त (a), (d), (f) (2) फक्त (b), (c), (e)
(3) फक्त (c), (d), (e) (4) फक्त (a), (c), (f)

The Council of Ministers in __________ states having large numbers of tribal population are mandated to include one minister for tribal affairs.

(a) Maharashtra (b) Tamilnadu (c) Orissa (d) Madhya Pradesh
(e) Bihar (f) Punjab

(1) Only (a), (d), (f) (2) Only (b), (c), (e)
(3) Only (c), (d), (e) (4) Only (a), (c), (f)

---

47. घटनेच्या कलम 19 अंतर्गत कशाची हमी दिलेली **नाही** ?

(1) भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार
(2) शांततेत आणि शस्त्रांसह एकत्र येण्याचा अधिकार
(3) संघटना, संघ किंवा सहकारी संस्था स्थापन करण्याचा अधिकार
(4) भारताच्या संपूर्ण प्रदेशात मुक्तपणे फिरण्याचा अधिकार

Which of the following is **not** Guaranteed under Article 19 of the Constitution ?

(1) Right to Freedom of Speech and Expression.
(2) Right to assemble peacefully and with arms.
(3) Right to form Associations or Unions or co-operative societies.
(4) Right to move freely throughout the territory of India.

---

**48.** खालीलपैकी **योग्य** व **अयोग्य** कथन/ने ओळखा :

(a) भारताचा नियंत्रक व महालेखा परीक्षक संघराज्याच्या लेखा विषयीचे अहवाल संसदे समोर सादर करेल.

(b) भारताचा नियंत्रक व महालेखा परीक्षक एखाद्या राज्याच्या लेखा विषयीचे अहवाल राज्याच्या विधानमंडळा समोर सादर करेल.

(1) (a) योग्य आहे, (b) अयोग्य आहे (2) (a) अयोग्य आहे, (b) योग्य आहे

(3) (a) व (b) दोन्हीही योग्य आहे (4) (a) व (b) दोन्हीही अयोग्य आहे

Select the **correct** and **incorrect** statement/s from the following :

(a) The reports of Comptroller and Auditor General of India relating to the accounts of the Union shall be submitted to Parliament.

(b) The reports of the Comptroller and Auditor General of India relating to the accounts of the State shall be submitted to the Legislature of the State.

(1) (a) is correct, (b) is incorrect (2) (a) is incorrect, (b) is correct

(3) Both (a) and (b) are correct (4) Both (a) and (b) are incorrect

---

**49.** अनुच्छेद 20 – अपराधांबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षणाच्या संबंधी **योग्य** कथने ओळखा.

(a) एकाच अपराधाबाबत एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही व्यक्तीवर खटला चालवला जाणार नाही आणि तिला शिक्षा दिली जाणार नाही.

(b) कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर स्वतः विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती केली जाणार नाही.

(c) जे कृत्य अपराध असल्याचा दोषारोप करण्यात आला असेल ते कृत्य एखाद्या व्यक्तीने करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याचा त्यामुळे भंग झाल्याखेरीज अशा कोणत्याही अपराधाबद्दल ती व्यक्ती दोषी ठरवली जाणार नाही तसेच तो अपराध करण्याच्यावेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली जी शिक्षा करता आली असती त्यापेक्षा कमी शिक्षेस ती पात्र ठरवली जाणार नाही.

(1) फक्त (a), (b) (2) फक्त (b), (c) (3) फक्त (a), (c) (4) वरीलपैकी सर्व

Select the **correct** statements about Article 20 - Protection in respect of conviction for offences.

(a) No person shall be prosecuted and punished for the same offence more than once.

(b) No person accused of any offence shall be compelled to be a witness against himself.

(c) No person shall be convicted of any offence except for violation of law in force at that time of the Commission of the Act charged as an offence, nor be subjected to a penalty smaller than that which might have been inflicted under the law in force at that time of the commission of the offence.

(1) Only (a), (b) (2) Only (b), (c) (3) Only (a), (c) (4) All of the above

---

**50.** खालीलपैकी **योग्य** कथने ओळखा :

(a) राष्ट्रीय राजधानी प्रक्षेत्राच्या मंत्रिमंडळाची नियुक्ती राष्ट्रपती द्वारे केली जाते आणि राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत ते पद धारण करतात.

(b) पाँडिचेरीच्या मंत्रिमंडळाची नियुक्ती उपराज्यपालाद्वारे केली जाते आणि त्यांची मर्जी असेपर्यंत ते पद धारण करतात.

(c) पाँडिचेरीमध्ये मंत्रिमंडळाची कायदेमंडळाप्रती कोणतीही जबाबदारी नाही. ती संकेताद्वारे विकसित होत आहे.

(1) फक्त (a), (b) (2) फक्त (b), (c) (3) फक्त (a), (c) (4) (a), (b) आणि (c)

Select the **correct** statements from the following :

(a) The Council of Ministers of the National Capital Territory is appointed by the President and hold office during the pleasure of the President.

(b) The Council of Ministers of Pondicherry is appointed by Deputy Lieutenant Governor and hold office during his pleasure.

(c) In Pondicherry, there is no ministerial responsibility to the legislature. It is developing through the convention.

(1) Only (a), (b) (2) Only (b), (c) (3) Only (a), (c) (4) (a), (b) and (c)

---

**51.** शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी कार्यरत म्हणून खालीलपैकी कोणत्या समाजसुधारकाचा प्रथमतः उल्लेख केला जातो ?

(1) कृष्णराव भालेकर (2) विठ्ठल रामजी शिंदे

(3) राजर्षी शाहू महाराज (4) महात्मा ज्योतिराव फुले

Which of the following social reformer is primarily mentioned as having worked for the upliftment of farmers ?

(1) Krishnarao Bhalekar (2) Vitthal Ramji Shinde

(3) Rajarshi Shahu Maharaj (4) Mahatma Jyotirao Phule

---

**52.** भाऊ महाजन यांनी कोणत्या वृत्तपत्रातून सामाजिक विषयावर लेखन केले ?

